14 MAR 2026
कोतीशिखर

# विद्यापीठात २३ मार्चपासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शिवाजी विद्यापीठाचा वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने जीएसटी रिफॉर्म्स, डिजीटायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेस: मार्चिंग टूवर्ड्स विकसित भारत२०४७ या विषयावर २३ मार्चपासून दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन विद्यापीठात केले आहे. ही माहिती अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे.या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रासाठी केंद्रीय जीएसटी व केंद्रीय उत्पादन शुल्क, वडोदरा येथील प्रधान आयुक्त सुरेंद्र मानकोस्कर प्रमुख पाहुणे म्हणून तर केंद्रीय विद्यापीठ, कर्नाटक येथील डॉ. व्ही. पांडुरंग बीजभाषक म्हणून उपस्थित राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. यमध्ये आयसीएआयच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य उमेश शर्मा, धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठातील डॉ. अंजू ताम्रगुंडी, नामदेव गवस (गोवा), सी.ए. आदित्य सोनटक्के (मुंबई) हे तज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

14 MAR 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

क्रांतीसिंह

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही ग्रंथालयांचे महत्त्व

कोल्हापूर(प्रतिनिधी):- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुकला संघटनेचे अध्यक्ष डॉ.मोहन खेरडे अध्यक्षस्थानी होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी व्यक्तीगत आयुष्यातील काही उदाहरणे देत ग्रंथालयांचे महत्त्व आपल्या भाषणात विषद केले.त्या म्हणाल्या,एक शिक्षक आणि संशोधक म्हणून आयुष्याला ग्रंथांनी खरा आकार दिला. ३६ वर्षांच्या संशोधकीय वाटचालीमध्ये ग्रंथालये आणि त्यांच्या ग्रंथपालांचे योगदान खूप मोलाचे ठरले आहे. ग्रंथालये ही ज्ञानाचे वाहक आणि प्रज्ञेचे निर्माते आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही या मूळ स्रोतांचे महत्त्व अबाधित राहणार आहे. कारण वस्तुनिष्ठ माहितीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेलाही अंतिमतः ग्रंथांवरच अवलंबून राहावे लागणार आहे. या युगात वाढलेल्या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ग्रंथालयांकडे आकर्षित करण्याचे आव्हान निश्चितपणे ग्रंथपालांसमोर उभे असून त्यामध्ये ते नक्की यशस्वी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिषदेचे संचालक डॉ. एस.ए.एन. इनामदार म्हणाले, जग आज एका ऐतिहासिक वळणावर उभे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या परिवर्तनाचे आपण साक्षीदार



आहोत.कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या वर्तमानावर मोठा प्रभाव टाकत आहे आणि भविष्याला आकार देण्यास सज्ज झाली आहे. ग्रंथालयांसाठी ती एक सक्षम संधी म्हणून सामोरी आली आहे. ग्रंथालयांनी नेहमीच तंत्रज्ञानातील बदल स्वीकारले आहेत. संगणकाच्या आगमनानंतर ग्रंथालयांचे ऑटोमेशन झाले. इंटरनेटमुळे ग्रंथालये डिजिटल प्रवेशद्वारे बनली. आता कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे स्वयंचलित कॅटलॉगिंग, मेटाडेटा निर्मिती आणि वर्गीकरण ही ग्रंथालयातील नियमित तांत्रिक कामे अधिक जलद आणि अचूक होतील.

एआय-आधारित चॅटबॉट विद्यार्थ्यांना, संशोधकांना २४ तास संदर्भ आणि रेफरल सेवा देऊ शकते. मशीन लर्निंग अल्गोरिदम वर्तन आणि शैक्षणिक ट्रेंडच्या वापराचे विश्लेषण करून ग्रंथपालाला संग्रह विकासात मदत करू शकते. तथापि, तंत्रज्ञान डेटा प्रक्रिया करू शकते, परंतु मानवी बुद्धिमत्तेची, ज्ञानाची जागा घेऊ शकत नाही.

भविष्यातील ग्रंथपाल केवळ पुस्तके आणि डेटाबेस व्यवस्थापित करणार नाही तर डेटा ग्रंथपाल आणि माहिती साक्षरता शिक्षक, संशोधन डेटा व्यवस्थापक, डिजिटल ज्ञान निर्माता आणि माहितीमध्ये नैतिक मार्गदर्शन करेल. आणि हे परिवर्तन साध्य करण्यासाठी, ग्रंथपालांना नवीन क्षमता आत्मसात करावी लागेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोहन खेरडे म्हणाले, ग्रंथालयांचा विकास हेच उद्दिष्ट घेऊन मुकला कार्यरत आहे. ग्रंथपाल हे केवळ प्रशासक नाहीत, तर सेवा पुरवठादार असण्याबरोबर ते शिक्षक आणि संशोधकही आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना नव्या युगातील संधी आणि आव्हाने यांसाठी सक्षम करण्याची जबाबदारी ते निश्चितपणे पेलतील.ग्रंथालये आणि प्रभावी आणि उपयुक्त बनविण्याच्या कामी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने ग्रंथपालांनी विचारविमर्श करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विलास जाधव यांना यंदाचा मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते. सुरवातीला ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आणि रोपास पाणी वाहून मान्यवरांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुकलाचे महासचिव डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. सौ. एस.डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले, तर उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
14 MAR 2026
तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंती साजरी



कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव सोबत.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. गुरूवारी सकाळी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, डॉ. अजित कोळेकर, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. भारती पाटील, डॉ. सुधीर देसाई, डॉ. संतोष सुतार, डॉ. उमेश गडेकर, डॉ. कविता वड्राळे, डॉ. वैशाली भोसले, डॉ. गजानन साळुंखे, चेतन गळगे, एच.ए. तिरमारे, डॉ. वैशाली सावंत, डॉ. परशुराम वडार, डॉ. प्रताप खोत, मृणालिनी जगताप, डॉ. दशवंत, डॉ. विश्वजित पाटील, सारंग कांबळे, वसुंधरा कांबळे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 4 MAR 2026
सकाळ

# विचारप्रवाहांची नवमांडणी हवी

## डॉ. देवरे : विद्यापीठात राज्यशास्त्र परिषदेस प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १३ : 'राज्यशास्त्रातील सिद्धांत आणि प्रत्यक्ष राजकीय व्यवहार यामध्ये वाढत चाललेली विसंगती समजून घेणे आणि त्यावर नव्या पद्धतीने विचारमंथन करणे अत्यावश्यक आहे. बदलत्या सामाजिक-राजकीय परिस्थितीत विचारप्रवाहांची नवी मांडणी करण्याची गरज आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. पी. डी. देवरे यांनी आज केले.**



कोल्हापूर : डॉ. रवींद्र भणगे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. पी. डी. देवरे. यावेळी उपस्थित डावीकडून डॉ. टी. एम. पाटील, अरुण चव्हाण, भारती पाटील, व्ही. एम. पाटील, शिरीषकुमार पवार आदी.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग, नेहरू अध्यास केंद्र, विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेने घेतलेल्या राज्यशास्त्र परिषदेच्या ३१ व्या अधिवेशन आणि दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व' या विषयावर डॉ. देवरे यांचे बीजभाषण झाले. प्राचार्य व्ही. एम. पाटील उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष होते. तर डॉ. भारती पाटील बीजभाषण सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. देवरे म्हणाले, 'विद्यापीठांमध्ये राज्यशास्त्राचे सिद्धांत, संकल्पना आणि विचारधारा शिकविल्या जातात; मात्र प्रत्यक्ष राजकारण आणि समाजव्यवहार यामध्ये मोठी तफावत दिसून येते. ही तफावत समजून घेऊन विद्यार्थ्यांना आणि समाजाला वास्तव परिस्थिती समजावून सांगणे ही राज्यशास्त्रज्ञ आणि प्राध्यापकांची जबाबदारी आहे. सोशल मीडियाद्वारे कृत्रिम आणि बनावट विचारनिर्मिती होण्याचा धोका वाढला आहे.'

डॉ. देशमुख म्हणाले, 'विकसित भारताचे स्वप्न घेऊन वाटचाल करीत असताना त्या विकासाला मानवी चेहरा देण्याची आपली जबाबदारी आहे.'

डॉ. पाटील म्हणाल्या, 'राजकारणाचा सार्वत्रिक आणि सर्वस्तरीय ऱ्हास, नैतिक पतन या पार्श्वभूमीवर राज्यशास्त्रीय संकल्पना मुळातून समजून घेणे आणि त्यांचे सातत्याने अधोरेखन करणे आवश्यक आहे.' प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, 'विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा राज्यशास्त्रीय विचारप्रणाली आणि प्रवाह यांच्यावर मोठा प्रभाव पडला आहे. त्याचा वेध घेण्यासाठी हे चर्चासत्र उपयुक्त भूमिका बजावेल.'

### विविध विषयांवर मांडणी

■ उद्घाटनानंतरच्या सत्रात 'भारतीय राजकीय विचारांची सद्यकालीन प्रस्तुतता' या विषयावर डॉ. चौसाळकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. के. के. ऊर्फ काशिनाथ कावळेकर स्मृती व्याख्यान मालेअंतर्गत डॉ. जयदेव डोळे यांनी 'सामाजिक चळवळ आणि राजकारण' या विषयावर विचार मांडले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. अरुण चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी लिहिलेल्या 'भूराजकारण, तंत्रज्ञान आणि भविष्यातील जागतिक व्यवस्था' या पुस्तकाचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. टी. एम. पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. श्रीराम पवार, शिवाजी पाटील, बाळासाहेब भोसले, बी. बी. पाटील, सिकंदर जमादार आदी उपस्थित होते.

14 MA.. 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजकीय व्यवहार विसंगतीवर राज्यशास्त्रीय मंथन व्हावे

## डॉ. पी. डी. देवरे; शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय चर्चासत्राला प्रारंभ

कोल्हापूर : राज्यशास्त्रातील सिद्धांत आणि प्रत्यक्ष राजकीय व्यवहार यामध्ये वाढत चाललेली विसंगती समजून घेणे आणि त्यावर नव्या पद्धतीने विचारमंथन करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. पी. डी. देवरे यांनी शुक्रवारी येथे केले. 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व' या विषयावर शिवाजी विद्यापीठात आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये बीजभाषक म्हणून बोलताना देवरे यांनी बदलत्या सामाजिक-राजकीय परिस्थितीत विचारप्रवाहांची नवी मांडणी करण्याची गरज अधोरेखित केली.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग, नेहरू अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद



यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र परिषदेचे ३१ वे अधिवेशन आणि दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे शुक्रवारी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. प्राचार्य व्ही. एम. पाटील व डॉ. भारती पाटील बीजभाषण सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. देवरे म्हणाले, विद्यापीठांमध्ये राज्यशास्त्राचे सिद्धांत, संकल्पना आणि विचारधारा शिकवल्या जातात; मात्र प्रत्यक्ष राजकारण आणि समाजव्यवहार यामध्ये मोठी तफावत दिसून येते. ही तफावत समजून घेऊन विद्यार्थ्यांना आणि समाजाला वास्तव परिस्थिती समजावून सांगणे ही राज्यशास्त्रज्ञ आणि प्राध्यापकांची जबाबदारी आहे. हेगेलने मांडलेली 'थिसिस-अँटीथिसिस-सिंथेसिस' ही प्रक्रिया समाजातील वैचारिक परिवर्तन सातत्याने घडवत राहते, असे त्यांनी नमूद केले.

अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख म्हणाले, विकसित भारताचे स्वप्न घेऊन वाटचाल करताना त्या विकासाला मानवी चेहरा देण्याची आपली जबाबदारी आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या त्रिसूत्रीच्या बळावरच हा विकास शक्य आहे. डॉ. भारती पाटील म्हणाल्या, राजकारणाचा सार्वत्रिक आणि सर्वस्तरीय ऱ्हास, नैतिक पतन या पार्श्वभूमीवर राज्यशास्त्रीय संकल्पना मुळातून समजून घेणे आणि त्यांचे सातत्याने अधोरेखन करणे आवश्यक आहे.

यावेळी संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी लिहिलेल्या 'भूराजकारण, तंत्रज्ञान आणि भविष्यातील जागतिक व्यवस्था' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. टी. एम पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. श्रीराम पवार, डॉ. शिवाज पाटील, डॉ. बाळासाहेब भोसले, डॉ. बी. बी. पाटील, सिकंद जमादार यांच्यासह परिषदे सदस्य, राज्यशास्त्राचे अध्याप संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थि उपस्थित होते.

14 MAR 2026

तरुण भारत

# 'कृत्रिम बुद्धिमतेमुळे तंत्रज्ञानाची प्रगती'

कोल्हापूर : कृत्रिम बुद्धीमतेमुळे गेल्या दोन वर्षात तंत्रज्ञानातील प्रगतीला प्रचंड गती मिळाली आहे. नोकऱ्या जाणार याची भीती सोडून 'ए आय' बाबत जागरुकता वाढवून त्याची कौशल्ये प्राप्त केली पाहिजेत, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक व माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ अतुल कहाते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्यावतीने आयोजित केलेल्या 'बिझनेस ॲप्लिकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटलीजन्स' या विषयावरील पाच दिवशीय मुल्याधिक अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**▪ विद्यापीठात मुल्याधिक अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

कहाते म्हणाले की, विषयांचे मुलभूत ज्ञान व कौशल्ये असावेच लागेल. 'ए आय' ची क्रांती त्सुनामीसारखी आली आहे, त्यावर स्वार होणारे टिकून राहतील, विरोध करणारे बाहेर फेकले जातील. कृत्रिम बुद्धिमतेच्या ज्ञान आणि कौशल्यासह विद्यार्थी जगातील प्रश्नांना सामोरे जावेत यासाठी या अभ्यासक्रमाचे आयोजन पीएम उषा (सॉफ्ट कॉम्पोनंट) अंतर्गत करण्यात आल्याचे प्रा. महाजन यांनी सांगितले.

स्वागत डॉ. केदार मारुलकर यांनी केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. या कोर्सअंतर्गत पुढील पाच दिवसात नामवंत तज्ञांची ३० व्याख्याने होणार आहेत.

14 MAR 2026

पुण्यनगरी

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे तंत्रज्ञान प्रगतीला गती : अतुल कहाते

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गेल्या साठ वर्षातील प्रगती कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे गेल्या दोन वर्षांत तंत्रज्ञानातील प्रगतीला प्रचंड गती मिळाली आहे. नोकऱ्या जाणार याची भीती सोडून 'एआय'बाबत जागरुकता वाढवून त्याची कौशल्ये प्राप्त केली पाहिजेत, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञानतज्ज्ञ अतुल कहाते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित केलेल्या 'बिझनेस ॲप्लिकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयावरील पाच दिवसीय मूल्याधिक अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

कहाते म्हणाले, विषयाचे मूलभूत ज्ञान व कौशल्ये असावेच लागेल; परंतु कार्यकलापाचे सुलभीकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतिकारक भूमिका बजावेल. 'एआय'सोबत काम करण्याची सवय करून घेतली पाहिजे. 'एआय'ची क्रांती त्सुनामीसारखी आली आहे. त्यावर स्वार होणारे टिकून राहतील, विरोध करणारे बाहेर फेकले जातील.

प्रास्ताविक डॉ. केदार मारुलकर यांनी केले, तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. या कोर्सअंतर्गत पुढील पाच दिवसांमध्ये नामवंत तज्ज्ञांची ३० व्याखाने होणार आहेत.